व्यय अग्रक्रम समितीस सादर करण्यात येणाऱ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावांबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : व्यअस २०२६/प्र.क्र.१४/अर्थसंकल्प-२,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०२ जून, २०२६.

**पहा :-** १) Finance Department, Government Resolution No. BGT- 2276/7/BUD-14, Dated: 29th December 1976 & Corrigendum Dated : 2nd February 1977

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.व्यअस २०२२/प्र.क्र.१२०/अर्थसंकल्प-२, दि. १९ ऑक्टोबर, २०२२

**शासन निर्णय :-**

वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ मधील, सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी सादर करण्याबाबतच्या तरतुदीमध्ये व्यय अग्रक्रम समितीच्या शिफारशीनुसार खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वित्तीय शक्तीचे वर्णन | सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास सक्षम असलेले प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेच्या १५ टक्के च्या मर्यादेत किंवा रु.१ कोटीच्या मर्यादेत वाढ असलेले सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रकल्प | प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (सदर अधिकार क्षेत्रिय स्तरावर प्रत्यायोजित करता येणार नाहीत) |
| २ | मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेच्या १५ टक्के पेक्षा अधिक मात्र रु.१० कोटीच्या मर्यादेत वाढ असलेले सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रकल्प | प्रशासकीय विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (नियोजन व वित्त विभागाची सहमती प्राप्त करवून घेऊन) |
| ३ | मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेच्या रु.१० कोटीपेक्षा अधिक वाढ असलेले सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रकल्प | व्यय अग्रक्रम समिती |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६०२१२०७३५६४०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2026.06.02 12:08:46 +05'30'

**(वि. रं. दहिफळे)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी (व्यय/अर्थसंकल्प), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवड नस्ती, अर्थ-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.